# MAHARASHTRA ACT No. XXXI OF 1962

## AN ACT TO PROVIDE FOR INCREASE IN CERTAIN STAMP DUTIES AND FURTHER TO AMEND THE BOMBAY STAMP ACT, 1958.

# सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.

[राज्यपाल यांची संमति मिळाल्यानंतर "महाराष्ट्र सरकारच्या राजपत्रांत" दिनांक १७ ऑगस्ट १९६२ रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला.]

## विवक्षित मुद्रांक शुल्कांत वाढ करण्याची तरतूद करणें व मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ यांत आणखी सुधारणा करणें याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, यांत यापुढें दिलेल्या कारणासाठीं विवक्षित मुद्रांक शुल्कांत वाढ करण्याची तरतूद करणें व मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८, यांत आणखी सुधारणा करणें इष्ट आहे ; त्याअर्थीं, भारतीय गणराज्याच्या तेराव्या वर्षीं, याद्वारें, पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे :—

१. (१) या अधिनियमास मुंबई मुद्रांक (शुल्कांत वाढ करणें व सुधारणा) अधिनियम, १९६२, असें म्हणावें. **लघु संज्ञा प्रारंभ.**

(२) तो, राज्य सरकार राजपत्रांत अधिसूचना प्रसिद्ध करून जी तारीख नेमील त्या तारखेस अंमलांत येईल.

२. मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (ज्याचा यांत यापुढें "मुख्य अधिनियम" असा उल्लेख करण्यांत आला आहे), याच्या कलम २ मध्यें, कंडिका (ल) नंतर, पुढील कंडिका दाखल करण्यांत यावी :— **सन १९५८चा मुंबई अधिनियम क्रमांक ६०, याच्या कलम २ ची सुधारणा.**

"(लअ) 'बक्षीसपत्र' या संज्ञेंत, जेव्हां कोणतीहि जंगम मालमत्ता बक्षीस म्हणून देण्यांत आली असेल परंतु बक्षीसपत्र लेखी करण्यांत आलें नसेल तेव्हां, असें बक्षीस तोंडी देण्यांत आल्याचें किंवा स्वीकारण्यांत आल्याचें जाहीरनाम्याच्या स्वरूपांत किंवा अन्य प्रकारें नमूद करणाऱ्या कोणत्याहि लेखाचा समावेश होतो ;".

३. मुख्य अधिनियमाच्या अनुसूचि १ मध्यें,— **सन १९५८चा मुंबई अधिनियम क्रमांक ६०, याच्या अनुसूचि १ ची सुधारणा.**

(१) अनुच्छेद ४ मध्यें, "तीन रुपये" या मजकुराऐवजीं, "तीन रुपये पन्नास नये पैसे" हा मजकूर दाखल करण्यांत यावा ;

(२) अनुच्छेद ५ यांत,—

(एक) नोंद (अ) मध्यें, "चाळीस नये पैसे" या मजकुराऐवजीं, "पन्नास नये पैसे" हा मजकूर दाखल करण्यांत यावा ;

(दोन) नोंद (ब) मध्यें, "तीस रुपयांच्या" आणि "वीस नये पैसे" या मजकुराऐवजीं, अनुक्रमें "चाळीस रुपयांच्या" आणि "पंचवीस नये पैसे" हा मजकूर दाखल करण्यांत यावा ;

(तीन) नोंद (क) (२) मध्यें, " चाळीस नये पैसे " या मजकुराऐवजीं, " पन्नास नये पैसे " हा मजकूर दाखल करण्यांत यावा ;

(चार) नोंद (ड) मध्यें, " वीस नये पैसे " या मजकुराऐवजीं, " पंचवीस नये पैसे " हा मजकूर दाखल करण्यांत यावा ;

(पांच) नोंद (इ) मध्यें, " (अ) चांदीच्या २८०० तोळयांच्या " या शब्दांनीं सुरू होणाऱ्या व " भागास साठ नये पैसे " या शब्दांनीं संपणाऱ्या मजकुराऐवजीं, पुढील मजकूर दाखल करण्यांत यावा :—

" (अ) चांदीच्या १० किलोग्रॅमच्या प्रत्येक युनिटास किंवा त्याच्या भागास दहा नये पैसे.

(ब) सोन्याच्या १ किलोग्रॅमच्या प्रत्येक युनिटास किंवा त्याच्या भागास चाळीस नये पैसे.

(क) २५० सॉव्हरिनच्या प्रत्येक युनिटास किंवा त्याच्या भागास पंचाहत्तर नये पैसे. " ;

(सहा) नोंद (फ) मध्यें, " राज्य सरकार राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें " या शब्दांनीं सुरू होणारा व " यापेक्षां अधिक नसेल असा दर " या शब्दांनीं संपणाऱ्या मजकुराऐवजीं, पुढील मजकूर दाखल करण्यांत यावा :—

" राज्य सरकार राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें निर्दिष्ट करील अशा दरानें म्हणजे,—

(१) ५,००० किलोग्रॅमचें युनिट असेल त्याबाबतींत, गळिताच्या धान्यांच्या प्रत्येक ५,००० किलोग्रॅमसाठीं किंवा त्याच्या भागासाठीं वीस नये पैसे ; किंवा

(२) १०,००० किलोग्रॅमचें युनिट असेल त्या बाबतींत, गळिताच्या धान्यांच्या प्रत्येक १०,००० किलोग्रॅमसाठीं किंवा त्याच्या भागासाठीं चाळीस नये पैसे ; किंवा

(३) २५,००० किलोग्रॅमचें युनिट असेल त्या बाबतींत, गळिताच्या धान्यांच्या प्रत्येक २५,००० किलोग्रॅमसाठीं किंवा त्याच्या भागासाठीं एक रुपया ;

यांपेक्षां अधिक नसेल असा दर. " ;

(सात) नोंद (ग) मध्यें, " वीस नये पैसे " या मजकुराऐवजीं, " पंचवीस नये पैसे " हा मजकूर दाखल करण्यांत यावा ;

(आठ) नोंद (ह) मध्यें, " एक रुपया पन्नास नये पैसे " या मजकुराऐवजीं " तीन रुपये " हा मजकूर दाखल करण्यांत यावा ;

(नउ) स्पष्टीकरणांतील " अदमासें ९,८०० रत्तल " या मजकुराऐवजीं, " अदमासें ४,५०० किलोग्रॅम " हा मजकूर दाखल करण्यांत यावा ;

(३) अनुच्छेद १० ऐवजीं पुढील मजकूर दाखल करण्यांत यावा :—

" १०. कंपनीची संघनियमावलि—

| | |
|---|---|
| (अ) जेव्हां कंपनीचें शेअर भांडवल नसेल किंवा नाममात्र शेअर भांडवल रु. १,००,००० पेक्षां अधिक नसेल तेव्हां ; | पन्नास रुपये. |

| | |
|---|---|
| (ब) जेव्हां नामभात्र शेअर भांडवल रु. १,००,००० पेक्षां अधिक असेल परंतु रु. ५,००,००० पेक्षां अधिक नसेल तेव्हां ; | दोनशें पन्नास रुपये. |
| (क) जेव्हां नाममात्र शेअर भांडवल रु. ५,००,००० पेक्षां अधिक असेल परंतु रु. १,००,००,००० पेक्षां अधिक नसेल तेव्हां :— | |
| (एक) पहिल्या ५,००,००० रुपयांवर ... ... | दोनशें पन्नास रुपये. |
| (दोन) पुढील ५,००,००० रुपयांवर किंवा त्यांच्या भागावर | पांचशें रुपये. |
| (तीन) पुढील १५,००,००० रुपयांवर किंवा त्यांच्या भागावर | सातशें पन्नास रुपये. |
| (चार) पुढील २५,००,००० रुपयांवर किंवा त्यांच्या भागावर | एक हजार रुपये. |
| (पांच) पुढील ५०,००,००० रुपयांवर किंवा त्यांच्या भागावर ; | एक हजार दोनशें पन्नास रुपये. |
| (ड) जेव्हां नामभात्र शेअर भांडवल रु. १,००,००,००० पेक्षां अधिक असेल तेव्हां. | पांच हजार रुपये. |

**माफी.**

फायद्याकरितां स्थापन न केलेल्या व कंपन्यांविषयीं अधिनियम, १९५६, याच्या कलम २५ अन्वयें नोंदलेल्या कोणत्याहि संघाची नियमावलि.

कंपनीचा संस्थापनसमयलेख (मेमोरँडम ऑफ् असोसिएशन) (क्रमांक ३९) देखील पहा.".

(४) अनुच्छेद १३ ऐवजीं, पुढील मजकूर दाखल करण्यांत यावा :—

"१३. बंधपत्र [कलम २(क) यांत व्याख्या केल्याप्रमाणें असलेलें], ऋण-पत्र नसलेलें व या अधिनियमान्वयें किंवा मुंबई न्यायालय शुल्क अधिनियम, १९५९, अन्वयें अन्यथा तरतूद केलेलें नाहीं असें—

| | रु. न.पै. |
|---|---|
| जेव्हां रक्कम किंवा तारण मूल्य ५० रुपयांहून अधिक नसेल तेव्हां | ०·७५ |
| जेव्हां ती ५० रुपयांहून अधिक असेल परंतु १०० रुपयांहून अधिक नसेल तेव्हां | १·५० |
| जेव्हां ती १०० रुपयांहून अधिक असेल परंतु २०० रुपयांहून अधिक नसेल तेव्हां | ३·०० |
| जेव्हां ती २०० रुपयांहून अधिक असेल परंतु ३०० रुपयांहून अधिक नसेल तेव्हां | ४·५० |
| जेव्हां ती ३०० रुपयांहून अधिक असेल परंतु ४०० रुपयांहून अधिक नसेल तेव्हां | ६·०० |
| जेव्हां ती ४०० रुपयांहून अधिक असेल परंतु ५०० रुपयांहून अधिक नसेल तेव्हां | ७·५० |
| जेव्हां ती ५०० रुपयांहून अधिक असेल परंतु ६०० रुपयांहून अधिक नसेल तेव्हां | ९·०० |
| जेव्हां ती ६०० रुपयांहून अधिक असेल परंतु ७०० रुपयांहून अधिक नसेल तेव्हां | १०·५० |
| जेव्हां ती ७०० रुपयांहून अधिक असेल परंतु ८०० रुपयांहून अधिक नसेल तेव्हां | १२·०० |
| जेव्हां ती ८०० रुपयांहून अधिक असेल परंतु ९०० रुपयांहून अधिक नसेल तेव्हां | १३·५० |
| जेव्हां ती ९०० रुपयांहून अधिक असेल परंतु १,००० रुपयांहून अधिक नसेल तेव्हां | १५·०० |
| आणि १,००० रुपयांपेक्षां अधिक असलेल्या प्रत्येक ५०० रुपयांबद्दल किंवा त्यांच्या भागाबद्दल. | ७·५० |

निर्वाहण पत्र (क्र. २), नौबंधक (क्र. १४), सीमा-शुल्क बंधपत्र किंवा उत्पादन शुल्क बंधपत्र (क्र. २८), निस्तारण बंधपत्र (क्र. ३५), नौवस्तुकर लेख (क्र. ५३), तारणखत (क्र. ५४) पहा.

**माफी.**

कोणत्याहि इसमानें धर्मार्थ दवाखाना किंवा रुग्णालय किंवा इतर कोणतीहि लोकोपयोगी संस्था यांस खाजगी वर्गणीपासून होणारें स्थानिक उत्पन्न दरमहा ठराविक रकमेपेक्षां कमी होणार-नाहीं अशी हमी देण्याच्या कारणासाठीं करून दिलेलें बंधपत्र." ;

(५) अनुच्छेद १६ मध्यें, " इतर महसूल अधिकाऱ्यानें " या शब्दांनंतर " किंवा सीमा शुल्क अधिकाऱ्यानें " हे शब्द दाखल करण्यांत यावेत ;

(६) अनुच्छेद २५ ऐवजीं पुढील मजकूर दाखल करण्यांत यावा :—

" २५(अ) कंडिका (ब) मध्यें निर्दिष्ट केलेल्या हस्तांतरपत्राव्यतिरिक्त इतर हस्तांतरपत्र, अनुच्छेद क्रमांक ५९ अन्वयें शुल्क आकारण्यांत येत असेल किंवा माफी दिली असेल असें हस्तांतर नसणारें,—

| | रु. न.पै. |
|---|---|
| असें हस्तांतरपत्र केल्याबद्दल त्यांत सांगितल्याप्रमाणें असलेल्या मोबदल्याची रक्कम किंवा किंमत ५० रुपयांपेक्षां अधिक नसेल तेव्हां. | १·५० |
| जेव्हां ती ५० रुपयांपेक्षां अधिक असेल परंतु १०० रुपयांपेक्षां अधिक नसेल तेव्हां | ३·०० |
| जेव्हां ती १०० रुपयांपेक्षां अधिक असेल परंतु २०० रुपयांपेक्षां अधिक नसेल तेव्हां | ६·०० |
| जेव्हां ती २०० रुपयांपेक्षां अधिक असेल परंतु ३०० रुपयांपेक्षां अधिक नसेल तेव्हां | ९·०० |
| जेव्हां ती ३०० रुपयांपेक्षां अधिक असेल परंतु ४०० रुपयांपेक्षां अधिक नसेल तेव्हां | १२·०० |
| जेव्हां ती ४०० रुपयांपेक्षां अधिक असेल परंतु ५०० रुपयांपेक्षां अधिक नसेल तेव्हां. | १५·०० |
| जेव्हां ती ५०० रुपयांपेक्षां अधिक असेल परंतु ६०० रुपयांपेक्षां अधिक नसेल तेव्हां. | १८·०० |
| जेव्हां ती ६०० रुपयांपेक्षां अधिक असेल परंतु ७०० रुपयांपेक्षां अधिक नसेल तेव्हां. | २१·०० |
| जेव्हां ती ७०० रुपयांपेक्षां अधिक असेल परंतु ८०० रुपयांपेक्षां अधिक नसेल तेव्हां. | २४·०० |
| जेव्हां ती ८०० रुपयांपेक्षां अधिक असेल परंतु ९०० रुपयांपेक्षां अधिक नसेल तेव्हां. | २७·०० |
| जेव्हां ती ९०० रुपयांपेक्षां अधिक असेल परंतु १,००० रुपयांपेक्षां अधिक नसेल तेव्हां. | ३०·०० |
| आणि १,००० रुपयांपेक्षां अधिक असलेल्या प्रत्येक ५०० रुपयांबद्दल किंवा त्यांच्या भागाबद्दल. | १५·०० |

**माफी.**—मुद्रणाधिकार अधिनियम, १९५७, अन्वयें केलेल्या नोंदीवरून केलेलें मुद्रणाधिकाराचें अभिहस्तांकन.

| | | | |
|---|---|---|---|
| (ब) हस्तांतरपत्र (अनुच्छेद क्रमांक ५९ अन्वयें शुल्क आकारण्यात येत असेल किंवा माफी दिली असेल असें हस्तांतर नसणारें) याच्या समोरील स्तंभाचे उपस्तंभ (१), (२) आणि (३) यांत किंवा यांअन्वयें निर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांत असलेल्या स्थावर मालमत्तेसंबंधीं असेल तेथवर— | बृहन् मुंबई आणि बृहन् मुंबईशीं संलग्न असलेला ठाणें-वसई खाडीनें परिवेष्टित असा ठाणें तालुक्याचा भाग. | पुणे व नागपूर या शहरांच्या आणि सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, धुळें, जळगांव व कल्याण या बरो नगरपालिकांच्या आणि अकोला, अमरावती, औरंगाबाद व जालना नगरपालिकांच्या हद्दींतील क्षेत्रें आणि त्यांच्यापैकीं कोणत्याहि शहरालगतच्या किंवा त्याच्या शेजारच्या क्षेत्रांपैकीं, त्यांतील औद्योगिक, व्यापारी किंवा आर्थिक विकासाची स्थिति लक्षांत घेऊन, राज्य-सरकार राज्यपत्रांतील अधिसूचनेद्वारें याबाबतींत वेळोवेळीं निर्दिष्ट करील अशीं इतर क्षेत्रें (मग तीं नागरी असोत किंवा नसोत). | उपस्तंभ (१) व (२) यांतील क्षेत्रां-व्यतिरिक्त इतर नगर-क्षेत्रें :— |
| | (१) | (२) | (३) |
| | रु. न.पै. | रु. न.पै. | रु. न.पै. |
| असें हस्तांतरपत्र केल्याबद्दल त्यांत सांगितल्याप्रमाणें असलेल्या मोबदल्याची रक्कम किंवा किंमत, २०० रुपयांपेक्षां अधिक नसेल तेव्हां. | २०.०० | १२.०० | १०.०० |
| जेव्हां ती २०० रुपयांपेक्षां अधिक असेल परंतु ३०० रुपयांपेक्षां अधिक नसेल तेव्हां. | ३०.०० | १८.०० | १५.०० |

| | (१) | (२) | (३) |
|---|---|---|---|
| | रु. न.पै. | रु. न.पै. | रु. न.पै. |
| जेव्हां ती ३०० रुपयांपेक्षां अधिक असेल परंतु ४०० रुपयांपेक्षां अधिक नसेल तेव्हां. | ४०.०० | २४.०० | २०.०० |
| जेव्हां ती ४०० रुपयांपेक्षां अधिक असेल परंतु ५०० रुपयांपेक्षां अधिक नसेल तेव्हां. | ५०.०० | ३०.०० | २५.०० |
| जेव्हां ती ५०० रुपयांपेक्षां अधिक असेल परंतु ६०० रुपयांपेक्षां अधिक नसेल तेव्हां. | ६०.०० | ३६.०० | ३०.०० |
| जेव्हां ती ६०० रुपयांपेक्षां अधिक असेल परंतु ७०० रुपयांपेक्षां अधिक नसेल तेव्हां. | ७०.०० | ४२.०० | ३५.०० |
| जेव्हां ती ७०० रुपयांपेक्षां अधिक असेल परंतु ८०० रुपयांपेक्षां अधिक नसेल तेव्हां. | ८०.०० | ४८.०० | ४०.०० |
| जेव्हां ती ८०० रुपयांपेक्षां अधिक असेल परंतु ९०० रुपयांपेक्षां अधिक नसेल तेव्हां. | ९०.०० | ५४.०० | ४५.०० |
| जेव्हां ती ९०० रुपयांपेक्षां अधिक असेल परंतु १,००० रुपयांपेक्षां अधिक नसेल तेव्हां. | १००.०० | ६०.०० | ५०.०० |
| आणि १,००० रुपयांपेक्षां अधिक असलेल्या प्रत्येक ५०० रुपयांबद्दल किंवा त्यांच्या भागाबद्दल. | ५०.०० | ३०.०० | २५.०० |

**स्पष्टीकरण.**—या अनुच्छेदाची कंडिका (ब) च्या कारणांकरितां—

(१) "पुणें शहर" म्हणजे पुणें महानगरपालिका आणि पुणें व खडकी छावणी यांच्या हद्दी ;

(२) "नागपूर शहर" म्हणजे नागपूर शहर महानगरपालिकेच्या हद्दी ;

(३) "नगर क्षेत्र" म्हणजे उपस्तंभ (१) आणि (२) यांत उल्लेख केलेल्या क्षेत्रांव्यतिरिक्त नगरपालिका, छावणी किंवा अधिसूचित क्षेत्र समिति यांच्या हद्दींतील कोणतेंहि क्षेत्र." ;

(७) अनुच्छेद २९ मध्यें "दहा नये पैसे" या मजकुराऐवजीं, "एक रुपया" हा मजकूर दाखल करावा ;

(८) अनुच्छेद ३६ ऐवजीं, पुढील अनुच्छेद दाखल करण्यांत यावा :—

"३६. पट्टा—यांत उप-पट्टयाचा किंवा पोट-पट्टयाचा व भाड्यानें किंवा पोट-भाड्यानें देण्याच्या कोणत्याहि कबुलायतीचा समावेश होतो.

(अ) अशा पट्टयावरून भाडें ठरविलें असून प्रिमियम दिलें किंवा स्वाधीन केलें नसेल तेव्हां,—

| | |
|---|---|
| (१) तो पट्टा एक वर्षाहून कमी मुदती-करितां असल्याचें अभिप्रेत असेल त्या बाबतींत ; | अशा पट्टयान्वयें जी रक्कम द्यावयाची किंवा स्वाधीन करावयाची असेल त्या एकूण रकमे-बद्दल, बंधपत्रावर (क्रमांक १३) जितकें शुल्क आकारतां येतें तितकें शुल्क. |

| | |
|---|---|
| (२) तो पट्टा एक वर्षाहून कमी नाहीं परंतु तीन वर्षांहून अधिक नाहीं इतक्या मुदतीकरितां असल्याचें अभिप्रेत असेल त्या बाबतींत ; | ठरविलेल्या सरासरी वार्षिक भाड्याच्या रकमेबद्दल किंवा किंमतीबद्दल बंधपत्रावर (क्रमांक १३) जितकें शुल्क आकारतां यतें तितकें शुल्क. |
| (३) तो पट्टा तीन वर्षांहून अधिक परंतु दहा वर्षांहून अधिक नाहीं इतक्या मुदतीकरितां असल्याचें अभिप्रेत असेल त्या बाबतींत ; | ठरविलेल्या सरासरी वार्षिक भाड्याच्या रकमेइतक्या किंवा किंमतीइतक्या मोबदल्याबद्दल अनुच्छेद २५, कंडिका (अ) किंवा यथास्थिति कंडिका (ब) अन्वयें हस्तांतरपत्रावर जितकें शुल्क आकारतां येतें तितकें शुल्क. |
| (४) तो पट्टा दहा वर्षांहून अधिक परंतु अठ्ठ्याण्णव वर्षांहून अधिक नाहीं इतक्या मुदतीकरितां असल्याचें अभिप्रेत असेल त्या बाबतींत ; | ठरविलेल्या सरासरी वार्षिक भाड्याच्या रकमेच्या किंवा किंमतीच्या दुप्पट मोबदल्याबद्दल अनुच्छेद २५, कंडिका (अ) किंवा यथास्थिति कंडिका (ब) अन्वयें हस्तांतरपत्रावर जितकें शुल्क आकारतां येतें तितकें शुल्क. |
| (५) तो पट्टा अठ्ठ्याण्णव वर्षांपेक्षां अधिक मुदतीकरितां असल्याचें अभिप्रेत असेल त्या बाबतींत ; | ठरविलेल्या सरासरी वार्षिक भाड्याच्या रकमेच्या किंवा किंमतीच्या तीन पट मोबदल्याबद्दल अनुच्छेद २५, कंडिका (अ) किंवा यथास्थिति, कंडिका (ब) अन्वयें हस्तांतरपत्रावर जितकें शुल्क आकारतां येतें तितकें शुल्क. |
| (६) तो पट्टा कायमच्या मुदतीकरितां असल्याचें अभिप्रेत असेल त्या बाबतींत ; | त्या पट्ट्याच्या पहिल्या पन्नास वर्षांबद्दल जें भाडें देण्यांत किंवा स्वाधीन करण्यांत येईल त्याच्या संपूर्ण रकमेच्या एक-पंचमांशाइतक्या मोबदल्याबद्दल अनुच्छेद २५, कंडिका (अ) किंवा यथास्थिति (ब) अन्वयें हस्तांतरपत्रावर जितकें शुल्क आकारतां येतें तितकें शुल्क. |
| (७) तो पट्टा कोणत्याहि निश्चित मुदतीकरितां असल्याचें अभिप्रेत नसेल त्या बाबतींत ; | पहिल्या दहा वर्षेपर्यंत तो पट्टा चालू राहिला तर त्या वर्षांबद्दल जें सरासरी वार्षिक भाडें देण्यांत किंवा स्वाधीन करण्यांत येईल त्याच्या रकमेइतक्या किंवा किंमतीइतक्या मोबदल्याबद्दल अनुच्छेद २५, कंडिका (अ) किंवा यथास्थिति कंडिका (ब) अन्वयें हस्तांतरपत्रावर जितकें शुल्क आकारतां येतें तितकें शुल्क. |
| (ब) तो पट्टा उपायन (फाईन) किंवा प्रिमियमबद्दल किंवा आगाऊ दिलेल्या पैशाबद्दल करून देण्यांत आला असेल व कोणतेंहि भाडें ठरविण्यांत आलें नसेल त्या बाबतींत; | त्या पट्ट्यांत उपायनाची किंवा प्रिमियमची किंवा आगाऊ दिलेल्या पैशाची जी रक्कम किंवा किंमत नमूद केली असेल तितक्या मोबदल्याबद्दल अनुच्छेद २५, कंडिका (अ) किंवा यथास्थिति कंडिका (ब) अन्वयें हस्तांतरपत्रावर जितकें शुल्क आकारतां येतें तितकें शुल्क. |
| (क) ठरविलेल्या भाड्याव्यतिरिक्त आणखी उपायन किंवा प्रिमियमबद्दल किंवा आगाऊ दिलेल्या पैशाबद्दल पट्टा करून देण्यांत आला असेल तेव्हां. | कोणतेंहि उपायन किंवा प्रिमियम किंवा आगाऊ पैसा देण्यांत किंवा स्वाधीन करण्यांत आला नसता तर त्या पट्ट्यावर जें शुल्क आकारतां आलें असतें त्याखेरीज आणखी त्या पट्ट्यांत त्या उपायनाची, प्रिमियमची किंवा पैशाची जी रक्कम |

| | |
|---|---|
| | किंवा किंमत लिहिली असेल तितक्या मोबदल्या-बद्दल अनुच्छेद २५, कंडिका (अ) किंवा यथास्थिति कंडिका (ब) अन्वयें हस्तांतरपत्रावर जें शुल्क आकारतां येतें तें शुल्क: |
| | परंतु, पट्टा करून देण्यासंबंधींच्या कबुलायतीवर पट्टयास आवश्यक असलेला मुद्रांक किंमती प्रमाणें लावला असेल व त्या कबुलायतीअन्वयें पुढें पट्टा करून देण्यांत आला असेल तेव्हां, अशा पट्टयावरील शुल्क तीन रुपयांहून अधिक असतां कामा नये. |

**स्पष्टीकरण** १.—आगाऊ दिलेली भाड्याची रक्कम भाड्याच्या शेवटच्या एका किंवा अनेक हप्त्यांमधून वळती करून घेण्यांत येईल अशी पट्टयांत खास तरतूद केली असेल तें खेरीज करून, आगाऊ दिलेली भाड्याची रक्कम ही, या अनुच्छेदाच्या अर्थाप्रमाणें प्रिमियम किंवा आगाऊ दिलेली रक्कम आहे असें समजलें पाहिजे.

**स्पष्टीकरण** २.—सरकारी महसूल, जमीन-मालकाचा उपकराचा हिस्सा किंवा नगर-पालिका पट्टी व कर यांपैकीं मालकाचा हिस्सा यासारखा जो कोणताहि आवर्तक आकार विधीअन्वयें पट्टा करून देणाऱ्याकडून वसूल करण्याजोगा असेल तो आकार देण्याची जबाबदारी पट्टेदार घेत असेल तेव्हां, पट्टेदा-रानें अशा रीतीनें देण्याचें कबूल केलेली रक्कम भाड्याचा भाग आहे असें समजलें पाहिजे.";

(९) अनुच्छेद ३९ ऐवजीं पुढील अनुच्छेद दाखल करण्यांत यावा :—

"३९. कंपनीचा संस्थापनसमयलेख—(मेमोरँडम् ऑफ् असोशिएशन)—

| | |
|---|---|
| (अ) कंपन्यांविषयीं अधिनियम, १९५६, कलम २६ अन्वयें संघनियमावली (आर्टिकल्स ऑफ् असोशिएशन) त्यासोबत जोडली असेल तेव्हां ; | शंभर रुपये. |
| (ब) सोबत संघनियमावली जोडलेली नसेल तेव्हां. | अनुच्छेद १० अन्वयें, कंपनीच्या शेअर भांडवला-नुसार संघनियमावलीवर जितकें शुल्क आकारतां येईल तितकें शुल्क. |

**माफी.**

फायद्याकरितां स्थापन न केलेल्या व कंपन्यां-विषयीं अधिनियम, १९५६, कलम २५ अन्वयें नोंदलेल्या कोणत्याहि संघाचा संस्थापन समयलेख.

(१०) अनुच्छेद ४३ मध्यें,—

(१) नोंद (अ) मधील, "वीस नये पैसे" या शब्दांऐवजीं, "पंचवीस नये पैसे" हे शब्द दाखल करावेत ;

(२) नोंद (ब) मध्यें, "(अ) चांदीच्या २८०० तोळ्यांच्या" या शब्दांनीं सुरू होणाऱ्या व "भागास साठ नये पैसे" या शब्दांनीं संपणाऱ्या मजकुराऐवजीं पुढील मजकूर दाखल करावा :—

"(अ) चांदीच्या १० किलोग्रॅमच्या प्रत्येक युनिटास किंवा त्याच्या भागास दहा नये पैसे.

(ब) सोन्याच्या १ किलोग्रॅमच्या प्रत्येक युनिटास किंवा त्याच्या भागास चाळीस नये पैसे.

(क) २५० सॉव्हरिनच्या प्रत्येक युनिटास किंवा त्याच्या भागास पंचाहत्तर नये पैसे. ";

(३) नोंद (क) मधील, "राज्य सरकार राजपत्रांत अधिसूचना प्रसिद्ध करून" या शब्दांनीं सुरू होणाऱ्या व "यांहून अधिक नसलेला दर ;" या शब्दांनीं संपणाऱ्या मजकुराऐवजीं, पुढील मजकूर दाखल करावा :—

"राज्य सरकार राजपत्रांत अधिसूचना प्रसिद्ध करून निर्दिष्ट करील अशा दरानें, म्हणजे,—

(१) ५,००० किलोग्रॅमचें युनिट असेल त्या बाबतींत, गळिताच्या धान्याच्या दर ५,००० किलोग्रॅमला किंवा त्याच्या भागास वीस नये पैसे, किंवा

(२) १०,००० किलोग्रॅमचें युनिट असेल त्या बाबतींत, गळिताच्या धान्याच्या दर १०,००० किलोग्रॅमला किंवा त्याच्या भागास चाळीस नये पैसे, किंवा

(३) २५,००० किलोग्रॅमचें युनिट असेल त्या बाबतींत, गळिताच्या धान्याच्या दर २५,००० किलोग्रॅमला किंवा त्याच्या भागास एक रुपया,

यापेक्षां अधिक नसेल असा दर. ";

(४) नोंद (ड) मध्यें "वीस नये पैसे" या शब्दांऐवजीं, "पंचवीस नये पैसे" हे शब्द दाखल करावेत;

(५) नोंद (इ) मध्यें, "चाळीस नये पैसे" या शब्दांऐवजीं "पन्नास नये पैसे" हे शब्द दाखल करावेत;

(६) नोंद (ग) मध्यें "तीस रुपयांच्या" आणि "वीस नये पैसे" या शब्दांऐवजीं अनुक्रमें, "चाळीस रुपयांच्या" आणि "पंचवीस नये पैसे" हे शब्द दाखल करावेत;

(७) स्पष्टीकरणामध्यें, "अदमासें ९,८०० रत्तल" या शब्दांऐवजीं, "अदमासें ४,५०० किलोग्रॅम" हे शब्द दाखल करावेत;

(११) अनुच्छेद ४६ मध्यें परंतुकाच्या कंडिका (अ) आणि (क) यांमध्ये, "एक रुपया पन्नास नये पैसे" या शब्दांऐवजीं, "तीन रुपये" हे शब्द दाखल करावेत;

(१२) अनुच्छेद ४७ ऐवजीं पुढील मजकूर दाखल करण्यांत यावा :—

"४७–भागीदारी—

अ—भागीदारीसंबंधींचा लेख—

(अ) भागीदारीचें भांडवल रु. २५,००० पेक्षां अधिक नसेल त्या बाबतींत; ... पन्नास रुपये.

(ब) इतर कोणत्याहि बाबतींत ... ... शंभर रुपये.

ब–भागीदारी मोडण्यासंबंधीं लेख ... ... तीस रुपये." ;

(१३) अनुच्छेद ५५, नोंद अ(२) च्या पहिल्या परंतुकामध्यें "एक रुपया पन्नास नये पैसे" या शब्दांऐवजीं "तीन रुपये" हे शब्द दाखल करावेत.

ंक क्रावर ाक कर एकमा ंकांत णें.

४. (१) मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८, यांत कांहींहि असलें तरी, यास जोडलेल्या कोष्टकांत निर्दिष्ट केलेल्या त्या अधिनियमाच्या अनुसूचि १ च्या अनुच्छेदांपैकीं कोणत्याहि अनुच्छेदांत उल्लेख केलेल्या लेखांच्या संबंधांत त्या अधिनियमान्वयें आकारण्यायोग्य असलेल्या मुद्रांक शुल्कांत, मुंबई मुद्रांक (शुल्कांत वाढ करणें व सुधारणा) अधिनियम, १९६२, याच्या प्रारंभापासून शेंकडा १० टक्के या दरानें अधिक कर बसवून वाढ करण्यांत येत आहे.

कोष्टक..

अनुच्छेद १, २(ब), ३, ५ (क) (१), ६, ७, ८(ब), ९, ११, १५, १६(अ) आणि (ब), १७, १८, २४, २६, २७(ब), २८(ब), ३०, ३१, ३७, ३८, ४०(क), ४१, ४२, ४३फ, ४४, ४५(अ), ४८(अ), (ब), (क), (ड), (इ) आणि (ग), ४९, ५०, ५१(ब), ५२(ब), ५४(ब), ५६, ५७, ५८(ब), ५९(क) आणि ६२.

(२) मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८, याचे उपबंध, जेथवर ते या कलमांतील कोणत्याहि मजकुराशीं विसंगत नसतील तेथवर, पोट-कलम (१) च्या कारणांसाठीं लागू असतील.

(३) पोट-कलम (१) अन्वयें अधिक कराची मोजणी करतांना, पांच नया पैशांपेक्षां कमी असणारा किंवा पांच नया पैशांच्या गुणांकांत नसेल असा रुपयाचा भाग पांच नया पैशांपर्यंत किंवा यथास्थिति पांच नया पैशांच्या लगतपुढील गुणांकांत रूपांतरित करण्यांत आला पाहिजे.

(True translation)
P. S. THORAT,
Examiner of Books and Publications, Bombay.